# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 29 March 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – २९ मार्च २०२६ सायंकाळी ०६.१०

****

- युद्धस्थितीमुळं निर्माण आव्हानांना एकजुटीनं सामोरं जाण्याचं पंतप्रधानांचं मन की बातमध्ये आवाहन
- क्रीडा क्षेत्रातील भरीव कामगिरीची पंतप्रधानांकडून प्रशंसा
- सरकारी जागेवर १५०० चौरस फुटांपर्यंत अतिक्रमण नियमबद्ध करणार- महसूलमंत्री बावनकुळे यांची माहिती

आणि

- मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलन जपतं संत साहित्याचा वारसा- मंत्री बाबासाहेब पाटील

****

पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीमुळं निर्माण झालेल्या आव्हानांना एकजुटीनं सामोरं जाण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमाच्या १३२ व्या भागामध्ये जनतेशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले...

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

युद्धग्रस्त भाग ऊर्जा निर्मितीचं मोठं केंद्र आहे. यामुळंच सध्या जगभरात पेट्रोल आणि डिझेलची समस्या निर्माण झाल्याचं ते म्हणाले. मात्र भारत, गेल्या दशकात निर्माण केलेलं सामर्थ्य आणि जागतिक संबंधांच्या जोरावर या आव्हानाचा खंबीरपणे सामना करत असल्याचं त्यांनी सांगितलं. आखाती देशांसह इतर देशांमध्ये

एक कोटीपेक्षा जास्त भारतीय नागरिक राहत आहेत. त्यांना  मदतीचा हात दिल्याबद्दल पंतप्रधानांनी आखाती  देशांचं आभार मानलं.

युवाशक्तीला अर्थसंकल्पाची प्रक्रिया आणि धोरणनिर्मितीशी जोडण्यासाठी 'माय भारत' संघटनेच्या वतीनं अर्थसंकल्पावर आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषेत देशभरातल्या १२ लाख युवा प्रतिनिधींनी सहभाग घेतल्याची माहिती त्यांनी दिली. या उपक्रमाअंतर्गत निवडलेल्या निबंधांमधून युवा वर्गानं राष्ट्रहिताचे अनेक मुद्दे मांडल्याचं त्यांनी सांगितलं. यातून देशाच्या विकासासाठी युवा वर्गाचा उत्साह दिसून येत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतला भारताचा विजय तसंच जम्मू काश्मीरनं प्रथमच रणजी चषक जिंकल्याचा उल्लेख करुन पंतप्रधानांनी देशाच्या क्रीडा क्षेत्रातल्या प्रगतीचा उल्लेख केला. पूर्वी फार लोकप्रिय नसलेल्या खेळांनाही आता युवा वर्गाची पसंती मिळत असल्याचं पाहून, तसंच देशाची स्त्रीशक्ती क्रीडा क्रांतीत बजावत असलेली भूमिका पाहून आनंद वाटत असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली. शिक्षण क्षेत्रातल्या अभिनव प्रयत्नांची माहितीही त्यांनी आज दिली.
पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेचा प्रभाव देशाच्या कानाकोपऱ्यात दिसू लागला आहे. त्यामुळेच आता शहरात मोठ्या प्रमाणात घरांच्या छतांवर सौर पॅनल बसवलेले दिसतात असं त्यांनी सांगितलं. या योजनेचा लाभ ईशान्य भारतातल्या जनतेला मिळत असून, विजेच्या उपलब्धतेमुळे तिथल्या गावांमधला जीवनाचा दर्जा सुधारल्याचं ते म्हणाले. 'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत देशभरात कोट्यवधी झाडं लावल्याचं पंतप्रधानांनी मन की बातमध्ये सांगितलं.

****

पोलीस ड्युटी मीट हा विविध राज्यांनी विकसित केलेल्या क्षमतांचं आदान प्रदान करण्यासाठी महत्त्वाचा मंच आहे, यामुळं सामूहिकरित्या आपली कार्यक्षमता वाढवण्यासाठी मदत होते असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. नागपुरात आज ६९ व्या अखिल भारतीय पोलीस ड्युटी मीटचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. पोलीस दल एक शिस्तबद्ध विभाग असून देशाच्या विकासात आणि अंतर्गत सुरक्षित पोलीस दलाचं योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचं ते म्हणाले.

****

सरकारी जागेवर १५०० चौरस फुटांपर्यंत असलेलं अतिक्रमण नियमबद्ध करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. या योजनेमुळं सुमारे १५ लाख कुटुंबांना लाभ होणार असल्याचंही त्यांनी आज नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलताना सांगितलं. सर्वसामान्य नागरिकांसाठी पट्टेवाटपाचा निर्णय घेतला असून, पट्टा मिळाल्यानंतर केवळ १ हजार रुपयांत नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचं ते म्हणाले. राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनात शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी २८ हजार प्रकरणं प्रलंबित होती. त्यासाठी ५७ लवादांची नियुक्ती करण्यात आली असून, लवकरच या प्रकरणांचा निकाल लागेल, असंही बावनकुळे यांनी सांगितलं.

अल्पभूधारक शेतकऱ्यांना कर्जमाफीची गरज असून, त्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती तयार होत आहे. थोडा वेळ लागेल, मात्र कर्जमाफी निश्चित होईल, असा विश्वास महसूल मंत्र्यांनी व्यक्त केला. राज्यात कुठंही पेट्रोल किंवा एलपीजीचा तुटवडा नसून, सामाजिक संपर्क माध्यमावरील अफवांमुळं नागरिक साठेबाजी करत असल्याची टीका त्यांनी केली. भोंदू अशोक खरात प्रकरणी पोलीस योग्य पद्धतीनं कारवाई करत आहेत. रूपाली चाकणकर यांना या प्रकरणात समन्स देणं म्हणजे अंतिम निर्णय नसून तपासानंतर पुढील कारवाई ठरवली जाईल, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

****

महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या भोंदू अशोक खरात याच्या पोलिस कोठडीत आज नाशिकच्या न्यायालयानं तीन दिवसांची वाढ केली आहे. यापूर्वीची त्याची पोलिस कोठडी संपल्यानंतर आज नाशिकच्या न्यायालयामध्ये त्याला हजर करण्यात आलं होतं खरात हा चौकशीत सहकार्य करत नाही. तसंच त्याच्याकडे बंदूक सापडली त्याचा वापर त्यांनी कशासाठी केला, आणखी दोन पीडित महिलांच्या तक्रारी आल्या आहेत त्यामुळं तपासासाठी त्याला पोलीस कोठडी वाढवून मिळावी, अशी मागणी सरकारी वकिलांनी केली होती.

****

ग्रामीण भागातील साहित्यिकांना व्यासपीठ मिळवून देण्याचे काम मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाच्या माध्यमातून शिक्षक आमदार विक्रम काळे सातत्यानं करत करत असल्याचे गौरद्गोगार राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी काढले आहेत. ते आज धाराशिव तालुक्यातील पळसप इथं ११ व्या मराठवाडा ग्रामीण

साहित्य संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संमेलनाध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.सुरेश सावंत यांच्यासह साहित्यिक आणि मान्यवर उपस्थित होते. मराठी साहित्याला मोठी परंपरा असल्याचं नमुद करत पाटील यांनी यावेळी संत साहित्याचा वारसा जपण्याचं कार्य मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाच्या निमित्तानं दरवर्षी होतं हे अभिमानास्पद असल्याचं स्पष्ट केलं. भालचंद्र नेमाडे, शरणकुमार लिंबाळे, ना. धों. महानोर यांच्या सारख्या लेखकांनी मराठी साहित्याला उंची दिली. मराठी भाषेतील अभंग, भारुड या कला प्रकारांनी समाज जागृतीचं काम केल्याचंही मंत्री पाटील म्हणाले.

****

१९व्या इंडियन प्रीमियर लीग – आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडीन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर सामना होणार आहे. मुंबईत संध्याकाळी साडे सात वाजेपासून हा सामना खेळवण्यात येईल. काल या स्पर्धेत बंगळुरू इथं झालेल्या पहिल्या सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघानं सनरायझर्स हैदराबादवर सहा गडी राखून सहज विजय नोंदवला.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कुठेही बालविवाह होत असल्यास त्याची माहिती १०९८ या क्रमाकांवर देण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे. बालविवाह रोखण्यासाठी सर्वांनी संवेदनशिलतेनं प्रयत्न करण्याची गरज असल्याचं प्रशासनाच्या वतीनं सांगण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातील वाढती गॅस टंचाई, दरवाढ आणि रिक्षाचालकांना भेडसावणाऱ्या अडचणींच्या निषेधार्थ शहरातील सर्व ऑटो रिक्षा संघटनांनी आज रविवारी मध्यरात्री बारा वाजेपासून चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनाच्या पूर्वतयारी निमित्त आज बैठक घेतल्याची माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी दिली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको एन–४ परिसरातील ग्राहकांना अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणनं ३३ केव्ही उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढ केली आहे. अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे यांच्या

हस्ते आज या उपकेंद्रातील १० एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आला. यामुळे  सुमारे २५ हजार वीज ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.

****

नांदेड शहरातील कौठावासियांना केंद्र शासनाच्या अमृत 2.0 योजनेअंतर्गत उद्यापासून २४ तास पाणीपुरवठा योजनेला प्रारंभ होणार आहे. माजी मुख्यमंत्री आणि खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते या पथदर्शी योजनेचं उद्घाटन होणार असल्याची माहिती कार्यकारी अभियंता सुमंत पाटील यांनी आज दिली.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या शाळेसाठी आवश्यक सर्व सुविधा पुरवण्यात येतील मात्र शिक्षकांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवावी असं आवाहन महानगरपालिका स्थायी समिती सभापती अनिल मकरीये यांनी शिक्षण विभागाच्या आढावा बैठकित केलं.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जालना जिल्हाप्रमुखपदी मनीष श्रीवास्तव यांची तर रुपम रमेश घुगे यांची महिला आघाडीच्या जिल्हा संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर इथं आज या पदाधिकाऱ्यांचा शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी सत्कार केला.

****